**महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन), अधिनियम २०११ मधील तरतुदीनुसार विभागीय शुल्क नियामक समिती गठीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: शाशैशु-२०१९/प्र.क्र. ५७ (भाग-१)/एसएम-६**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२
तारीख: ०५ मे, २०२६

**संदर्भ-**

१. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन), अधिनियम २०११
२. शासन अधिसुचना, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. शाशैशु-२०१९/प्र.क्र. ५७/एसएम-६, दिनांक १८.०३.२०२६

**प्रस्तावना-**

महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम,२०११ संपूर्ण राज्यात लागू करण्यात आला आहे. सदर अधिनियमातील तरतूदीनुसार विभागीय शुल्क नियामक समती व पुनरिक्षण समती गठीत करण्यात येते. सदर अधिनियमाच्या कलम ७ च्या पोट कलम (१) मधील तरतूदीनुसार संदर्भाधीन क्र. २ च्या दिनांक १८ मार्च २०२६ रोजीच्या अधिसुचनेन्वये मुंबई, पुणे, नागपूर व छत्रपती संभाजीनगर या शैक्षणिक विभागांसाठी विभागीय शुल्क नियामक समित्या गठीत करण्यात आल्या असून कोल्हापूर, नाशिक, लातूर व अमरावती येथे विभागीय शुल्क नियामक समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

दिनांक १८ मार्च २०२६ रोजीच्या अधिसुचनेन्वये मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर व नागपूर येथे गठीत करण्यात आलेल्या विभागीय शुल्क नियामक समितीकडे खालीलप्रमाणे अनुक्रमे कोल्हापूर, नाशिक, लातुर व अमरावती या शैक्षणिक विभागातील विभागीय शुल्क नियामक समितींचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विभागीय शुल्क नियामक समिती | अतिरिक्त कार्यभार |
|---|---|---|
| १ | विभागीय शुल्क नियामक समिती, मुंबई | विभागीय शुल्क नियामक समिती, कोल्हापूर |
| २ | विभागीय शुल्क नियामक समिती, पुणे | विभागीय शुल्क नियामक समिती, नाशिक |
| ३ | विभागीय शुल्क नियामक समिती, छत्रपती संभाजिनगर | विभागीय शुल्क नियामक समिती, लातूर |
| ४ | विभागीय शुल्क नियामक समिती, नागपूर | विभागीय शुल्क नियामक समिती, अमरावती |

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०५०५१४३८१९९२२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DNYANESHWAR ASARAJI AVHAD

Digitally signed by DNYANESHWAR ASARAJI AVHAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SCHOOL EDUCATION AND SPORTS DEPARTMENT, 2.5.4.20=190ce31a764c50caee9a11b81ac560fc0d85bb0ebc377f46c4fc0040aae47135, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=05AE42076719D0FCE5DC8ACF3A44FBA50819DD0D088B25A2D0D7CDE0256A48B0, cn=DNYANESHWAR ASARAJI AVHAD
Date: 2026.05.05 14:39:07 +05'30'

**(ज्ञानेश्वर आ. आव्हाड)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव.
४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे खाजगी सचिव.
५. मा. मंत्री ,शालेय शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव.
६. मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव.
७. मा. मुख्यसचिव यांचे खाजगी सचिव.
८. प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग ), मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.
९. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
११.शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे .
१२.संचालक, माहिती व जनसंपर्क सचिवालय, मंत्रालय, मुंबई. (यांना विनंती करण्यात येते की, कृपया उक्त तपशिलास व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी).
१३.सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक यांना सूचना देण्यात येते की, त्यांनी सदर शासन निर्णय सर्व शैक्षणिक संस्थाच्या निदर्शनास आणुन त्यांच्या संकेतस्थळावर/सुचना फलकावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी व समिती बाबत व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.
१४.सर्व शिक्षण अधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद.
१५.सर्व शिक्षण अधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद.
१६.निवडनस्ती एसएम-६.